# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in

**जा.क्र. मनपा/आस्था/ २५/४ /२०२५-२६** **दि. ०४/ १२ /२०२५**

**प्रत्यायोजन आदेश**

विषय :- उपायुक्त पदाच्या पदभाराबाबत...

संदर्भ :- १. जा.क्र.मनपा/आस्था/२२४६/२०२५-२६, दि.१०/११/२०२५ रोजीचा आदेश.
२. शासन आदेश क्रमांक : प्रतिनि-२०२५/प्र.क्र.४३५/नवि-१४, दि.२१ नोव्हेंबर, २०२५.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील "उपायुक्त यांचेकडे सोपविलेल्या विविध विभागांचे पदभाराबाबत यापूर्वी पारित केलेले सर्व आदेश याद्वारे अधिक्रमित करून सदरचे नव्याने आदेश पारित करणेत येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 49 अन्वये खालील दर्शविलेल्या खात्यांचे/विभागांचे प्रशासन आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळ्या प्रकरणांत विविध तरतुदीखाली नमूद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्य, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणसापेक्ष खालील उपायुक्त याच्या नावाखाली दर्शविल्याप्रमाणे या आदेशान्वये सोपविण्यांत येत आहेत.

अ) **श्री.सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय)**

१. आस्थापना/सामान्य प्रशासन
२. निवडणूक व जनगणना
३. घनकचरा व्यवस्थापन विभाग (दैनंदिन कचरा संकलन व घनकचरा प्रकल्प)
४. अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विभाग
५. अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन व नियंत्रण
६. विधी विभाग
७. क्लस्टर डेव्हलपमेंट
८. पशुसंवर्धन विभाग
९. स्थानिक संस्था कर विभाग
१०. अभिलेख

ब) **श्रीम.कविता बोरकर उपायुक्त**

१. सार्वजनिक आरोग्य विभाग
२. उद्यान व वृक्ष प्राधिकरण
३. फेरीवाला धोरण व नियंत्रण
४. जाहीरात विभाग
५. ग्रंथालय
६. पर्यावरण
७. परवाना
८. शिक्षण
९. समाज विकास विभाग (NULM सह)
१०. क्रिडा आणि सांस्कृतिक कार्यक्रम
११. महिला व बाल कल्याण विभाग

क) **श्रीम.प्रणाली घोंगे, उपायुक्त**

१. मालमत्ता कर
२. परिवहन
३. वाहन व यांत्रिकी विभाग
४. मध्यवर्ती भांडार
५. बाजार लिलाव
६. सुरक्षा विभाग
७. पे ॲन्ड पार्क
८. जनसंपर्क
९. भुईभाडे
१०. माहिती व तंत्रज्ञान
११. ई-टेंडरींग, सी.सी.टीव्ही यंत्रणा

वरील विभागांचे कामकाज वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकारांच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरण मंजूर करण्यापूर्वी मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरीक्षक यांची सहमती घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पूर्व मान्यतेने व मंजूरीनेच पाठविणे बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका उपायुक्तांनी आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी ह्या सर्व प्रयोजनांसाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ नुसार मानले जाईल.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

१. श्री.सचिन बांगर, उपायुक्त
२. श्रीम.कविता बोरकर, उपायुक्त
३. श्रीम.प्रणाली घोंगे, उपायुक्त

**प्रत माहितीस्तव**

१. अतिरिक्त आयुक्त (सर्व)
२. सर्व विभाग प्रमुख/खातेप्रमुख
३. आदेशनस्ती